म. ग्रं. सं. ठाणें.
विषय .. काव्य
सं. क्र. ८५१

काव्य

# जानकी काव्य.

REFBK-0003977
REFBK-0003977

सी. ग. मनाठकर.

दक्षिण हैद्राबाद येथील

महाराष्ट्रवाङ्मयमंडळाचें पुस्तक दुसरें

# जानकी काव्य.

लेखक

सीताराम गणपतराव मनाठकर

एम. ए.

REFBK-0003977
REFBK-0003977

शके १८५१ शुक्ल संवत्सर.

कि. ८ आणे.

प्रकाशक — सी. ग. मनाठकर.

—*—

मुद्रक — गणेश अनंत सराफ,
श्रीदत्त मुद्रणालय
नांदेड.

सर्व हक्क प्रकाशकाचें स्वाधीन.

# अर्पण पत्रिका.

देशभक्ती खुले ज्याचीं उषेपरी चिरंतनी,
भारता ! जो तुझ्यासांठीं तोषला स्वार्थ होमुनी,
धर्मसिंधू महाज्ञानी, विभूती दिव्य ईश्वरी,
विनायकास त्या माझी कृति प्रेम भरें वरी !

सी. ग. मनाठकर.

# कथानकांतील पात्रें व स्थळें.

**नाना**—तालंगगांवाचे कुळकर्णी, जानकीचे ( गौरीचे ) वडील.
**सांब**—केदारवनांत राहणारा नानाचा मित्र.
**राघव**—केशवाचे वडील.
**केशव**—कथानायक.
**प्रभाकर**—केशवाचा मुलगा.
**रमाई**—गौरीची आई.
**माई**—सांबाबरोबर केदाराश्रमांत राहणारी विरक्त वृद्धा.
**जानकी**—कथानायिका.
**मालती**—पुण्यांत ज्या घरीं केशव भाड्यानें राहत होता त्या घराच्या मालकाची विधवा मुलगी.
**अंबिरा**—जानकीस टाकून बोलणारी एक गांवगोंदी स्त्री.
**चांदिमा**—आश्रमांतल्या हरिणीचें नांव.
**तालंग**—जानकीचें माहेर.
**मावण**—जानकीचें सासर.
**पुणें**—महाराष्ट्रांतील विद्येचें केंद्रस्थान.

# प्रस्तावना.

श्री. **मनाठकर** हे मराठी वाङ्मय वाचकांना जरी फारसे परिचित नसले तरी ते एक कसलेले कवि आहेत हें, त्यांचें लहानगें ‘ **जानकी-काव्य** ’ वाचूनहि रसिकांच्या ध्यानीं येईल. कथा अगदीं सरळ व अल्प असली तरीहि तिच्यामधील कारुण्यरसानें वाचणाराचें हृदय आकर्षून जातें. खरा कवि तो, कीं, जो कोणतीहि मोठी वा लहान कथा कथित असतां ती वाचणारांची वा ऐकणारांची मनें त्या कथेकडे खेंचून घेऊन क्षणमात्र त्यांना त्यांच्या स्वत:चा विसर पाडावयास लावून, त्या कथेंतील कथानकाशीं आपल्या इच्छेप्रमाणें त्यांची मनें एकरूप करू शकतो. ही जर जातिवंत कवीची कसोटी आपण ‘ **जानकी-काव्यास** ’ लावूं लागलों तर तें काव्य वाचीत असतां आपल्या मनोवृत्ति त्यामध्यें वर्णन केलेल्या निरनिराळ्या प्रसंगांशीं इतक्या एकरूप होऊन जातात कीं, ‘ हा जातिवंत कवि आहे ’ हें सत्य कुणी न सांगतांहि आपणांस पटतें.

या कथेंतील कथानक अगदींच साधें आहे. पत्नीच्या निधनानें अर्धवट विरक्त बनलेल्या एका गृहस्थाला एकच अल्पवयस्क बालिका जगाच्या उदास झालेल्या वसतीमध्यें कांहीं तरी विरंगुळा देत असते. तिच्या बाललीलांनीं व निर्व्याज ममतेनें तो कष्टमय संसाराचा गाडा कसाबसा हांकित असतो. अकस्मात् त्यास मृत्यु येतो. मृत्यूच्या थोडें आधीं त्याचा एक असाच वैराग्यानें वनवास पत्करलेला स्नेही येतो. त्याच्या स्वाधीन ती कोमल बालिका केली जाते.

तो स्नेही तिला आपल्या वनांतील निवासांत घेऊन जाऊन तेथेंच आश्रयाला असलेल्या एका विरागिणीच्या परिपालनांत ठेवितो. ते दोघेहि त्या अर्भकाला स्वापत्यनिर्विशेषपणानें परिपालित करतात. कालाच्या तालाबरोबर ती बालिका हळूं हळूं कौमार्याचें क्षेत्र आक्रमण करून यौवनाच्या सीमेच्या आंतबाहेर खेळूं लागते. त्याचवेळीं तो वृद्ध स्नेही त्या तरुण बालिकेला अनुरूप असा वर संशोधून काढतो व त्यास यथाशास्त्र विवाहमार्गें त्या बालिकेला समर्पून कण्वऋषीप्रमाणें **'जातो ममायं विशदः प्रकामं। प्रत्यर्पितन्यास इवांतरात्मा'** असे धन्योद्गार काढीत वनाला निघून जातो. पुढें अल्पावधींतच या नूतन दांपत्यास एक कमनीयपुत्र प्राप्त होतो. मध्यंतरी तो युवक पुण्यास कांहीं काळ रहातो. तेथें एका बाळपणांतच वैधव्याच्या घाल्यानें भग्नसौख्य झालेल्या दुर्दैवी तरुणीशीं परिचयप्रसंग घडतो. त्यामुळें त्याच्या मनास स्वतःविषयींच संताप उत्पन्न होऊन त्याच मनःस्थितींत तो घरीं परत येतो. तों एका कजागबाईच्या भांडणांत स्वतःच्या पत्नीविषयीं कांहीं दुर्वार्ता ऐकतो. तत्क्षणीं संतापानें बेभान होऊन पत्नीस मारावयास निघतो. इतक्यांत मनाला थोपवून धरून सुविचार करतो व शांत होतो. तरी संशयाक्लिन्न मनानें पत्नीबरोबरचें आनंद, सुख, प्रेम यांचे व्यवहार बंद पडून त्या उभयतां पति-पत्नींचें गृहसौख्य नष्ट होतें. अशा अवस्थेंतच त्यांच्या गांवीं प्लेग सुरू होऊन त्यांत त्याला प्लेग होतो व मरणाच्या आधीं तो पत्नीला बोलावून आणून तिच्याशीं शेवटचें प्रेमाचें भाषण करतो. पत्नी आपल्या पतिनिधनाची ती आगामी सूचना जाणून स्वतःचाहि अंत करून घेण्याचा निश्चय करते. या दुःखी पत्नीचेंच नांव **जानकी** अशा रीतीनें हें कथानक शेवटीं शोकपर्यवसायी होऊन संपतें.

या कथेचें नांव **' जानकी-काव्य '** हें जरा आंतील कथेच्या मानानें अवजड होतें. तरीहि त्यांतील ठिकठिकाणीं मनोरम व नाविन्यपूर्ण कल्पनांनीं चित्त आल्हादित होतें. सर्व कथासूत्रांत कारुण्यरसच भरलेला आहे, व तो प्रत्येक ठिकाणीं सहज सुलभरीतीनें साधला आहे. या कवितेचें वृत्तहि पुराणकवींनीं गौरविलेलें व आधुनिक कालांत प्रसिद्ध ' कमला ' काव्याचे कर्ते

काव्य नं. ५७०

**श्री. बॅ. विनायकराव सांवरकर** यांनीं पुनरुज्जीवित केलेलें असें सरळ, साधें परंतु हृदयस्पर्शी ' **अनुष्टुप-छंदाचें** ' पसंत केलेलें आहे. ' जानकी-काव्यावर ' ' कमला-काव्याचें ' प्रतिबिंब पडल्याचा ठिकठिकाणीं भास होतों. तरीहि ' जानकी-काव्य ' हें पूर्णपणें स्वतंत्रच भासतें.

हें गीत वाचतां वाचतां अनेक ठिकाणीं वाचणारांचें चित्त काव्यांतील हृदयंगमतेनें खिळून गेल्यासारखें वाटतें. अनेक ठिकाणीं कल्पनाहि हृदयंगम आहेत.

उदाहरणार्थः-( प्रसंग २ ) छंद २६.

मध्याह्नीं अंबरीं चेंडू, खालीं पडेल जाणुनी ।
मेघाचें लाविलें जाळें, जगन्नाथें दिशांतरां ॥

( प्रसंग ३ ) छंद ७.

श्रांतल्या अंतराचीं तीं दारें लोचन श्रांतलीं ।
घेई लावूनिया निद्रा सुधाधारा जगांतली ॥

छंद १३.

सोबती मारितां हांक, कधीं देई न उत्तरा ।
मनाचा पक्षि गेलासे नीडातून उडोनिया ॥

( प्रसंग ५ ) छंद ३४.

दिनीं एक्या दळी माई साथ गौरी तिची करी ।
उभे किरण भानूचे, कुडासी गान ऐकिण्या ॥

छंद ६३.

तारुण्याचा नवा प्रांत   नवें सारेंच गौरिसी ।
आतांसी तीस ती लज्जा   भेटाया येउं लागली ॥

( प्रसंग ८ ) छंद ६९.

अधरीं हांसणें गोड   एकदां शोभुं द्या तरी ।
शुद्ध होईन मी त्यांत   उषःकालीं निशा जशी ॥

विस्तारभयास्तव इतकेंच दिग्दर्शन पुरें आहे.

अंतीं एक आशा करावीशी वाटते कीं असल्या प्रतिभावान् कवीची काव्यकल्पना या वैयक्तिक सुख दुःखाच्या पायवाटेनें लवकरच राष्ट्रीय व हिंदुजातीय सुखदुःखाच्या पवित्र क्षेत्रीं पोंचेल व सर्व राष्ट्रीय कथाकहाणीनें आपल्या काव्यवीणेच्या तारा छेडून वाचकांच्या व श्रोत्यांच्या अंतःकरणांत राष्ट्रप्रेमाचे व धर्मप्रेमाचे तरंग उसळवून देऊन त्यांना कार्यप्रवण करील.

पूजासदन
लक्ष्मीनगर ( खार )
आषाढ शु० २ शके १८५१.

ना. दा. सांवरकर.

नोंद नं. ……
ठाणे

# 'निवेदन.'

महाराष्ट्रशारदेस माझें हें पहिलेंच वंदन आहे. 'कांहीं तरी तुम्ही आपलें लिखाण प्रसिद्ध कराच,' अशा कांहीं सन्मित्रांच्या आग्रहावरूनच हें साहस केलें. मी जर दोषी ठरेन तर माझे मित्रहि उत्तेजन देण्याच्या आरोपावरून दोषी ठरले पाहिजेत.

काव्याचें कथानक कुठें घडूनच आलें नाहीं, असें नाहीं. 'ह्या कथेंतील सहाव्या आणि सातव्या प्रसंगांत लेखकाच्या आयुष्याचें प्रतिबिंब उठलें आहे, ह्या उक्तींत कांहींसें सत्य असूं शकेल. कथा गुंफण्याचा काळ म्हणजे लेखकाचें १९२५ वें वर्षीं एम्. ए. च्या अभ्यासक्रमाकारितां महाराष्ट्र सोडून कलकत्ताशहरीं जाणें.

ह्या काव्यांत नादलोलुप निराश होतील, यमकप्रिय भग्नाश होतील, हेतुकारणवादी उद्विग्न होतील, गूढगुञ्जनवादी विषण्ण होतील! शाकुंतलामध्यें एका कविटीकाकारास स्वर्गपृथ्वीमीलन दिसलें, तसें ह्याहि काव्यांत एखादें गूढ प्रमेय सांपडल्यास मला आनंदच होईल!

ज्यांनीं आपल्या अमूल्य वेळेचा व्यय करून प्रस्तावना लिहून दिली, त्यांचे आभार किती मानावें, हेंच कळत नाहीं! ज्या मित्रांनीं स्वतःच्या पदराला खार लावून घेऊनहि माझें काव्य खिळ्यांच्या जाचांत ढकललें, त्यांच्यावरचा राग मात्र कमी होणार नाहीं!

शेवटीं महाराष्ट्रांतील स्थितप्रज्ञ टीकाकारांवर हवाला टाकून लेखणी थांबवितों.

नांदेड ( सिद्धनाथपुरी ) निझामस्टेट.
मिति आषाढ शु. ११ शके १८५१.

**लेखक.**

# शुद्धिपत्रक.

| पान | श्लोक | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| २ | १२ | सतांच | सतीचें |
| ९ | ६ | तमा | तमीं |
| १० | १२ | ठाक | ठाकें |
| १९ | ३९ | क्षमा करी | क्षमा करी" |
| २२ | २ | आपूर्व | अपूर्व |
| २७ | ४२ | कठें | कुठें |
| ३८ | ६ | आसवा | आसवीं |
| ४४ | ३ | उषाशी | उशासी |
| ४८ | ४० | चळचळा | चळ्चळा |
| ५३ | ३ | दीनं | दीन |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ३८७७

# जानकी-काव्य.

## प्रसंग पाहिला.

नानाच्या दुष्ट दैवानें, फिरोनी वांकडें जरा,
मृत्युचा मारिला बाण नानाच्या गेहिनीहृदीं. १

पूर्वेपरी सुखाची जी जन्मदा ह्या भवीं सखी,
लया जातांच, गेली हो! जीवनांतून माधुरी. २

उषेसी देउनी जन्म लया जाते निशा जशी,
गौरिसी देउनी गेली नानाची सखिही तशी. ३

दुःखाच्या सागरीं लाभे वृद्धासी नाविका अशी,
उदेली कोर आशेची निराशेच्या नभामधीं. ४

प्रेमाच्या गोड शब्दांनीं, भाबडीं कोंवळीं हृदें,
नानासी धीर देती हो, तालंगी तीं पदोपदीं. ५

गुंगलें प्रेम नानाचें गौरीच्या वदनांबुजीं,
साजणीच्या वियोगाची बोथटूं धार लागली. ६

# शुद्धिपत्रक.

| पान | श्लोक | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| २ | १२ | सर्तांच | सतीचें |
| ९ | ६ | तमा | तमीं |
| १० | १२ | ठाक | ठाकें |
| १९ | ३९ | क्षमा करी | क्षमा करी" |
| २२ | २ | आपूर्व | अपूर्व |
| २७ | ४२ | कठें | कुठें |
| ३८ | ६ | आसवा | आसवीं |
| ४४ | ३ | उषाशी | उशासी |
| ४८ | ४० | चळचळा | चळ्चळा |
| ५३ | ३ | दीनं | दीन |

बोबड्या गोड शब्दांचें, गौरिच्या गोड आननीं-,
घेतलें शुद्ध शब्दांनीं, स्थान जेव्हां हिरावुनी; ७

जगींही वास सौख्याचा नानासी येउं लागला,
आनंदाचें बघे फूल उमलाया हळूंहळूं. ८

तालंगीं बाळगौरीसी पाहुनी लोक बोलती;
'उजेडा वांचुनी फूल मूल आईविना तसें. ९

रमाई राहत्या आज किती आनंद नांदतां!
शेवटीं ही अशी तोंडीं पडती गोड साखर! १०

बिचारीच्या परी भाळीं लेख कैसा बघा जरा,
आरंभही नसे गोड! अंत तोही तशा परी! ११

सतीच त्या कसें प्रेम! साधा स्वभावही किती!
माउली ना दिसायाची जन्मजन्मांतरीं अशी! १२

गांवाची ह्या घराची त्या गेली शोभा उडोनिया;'
रमाईचें तसें प्रेम, लावी लोकां रडावया. १३

गांवलोकांविना आप्त नानासी न जगांतरीं,
फुटे ज्यांच्याहि भक्तीनें जीवनाशेस पालवी. १४

जेवूं घाली, कुणी न्हाऊं घाली हो, गौरिसी यदा,

फिरोनी ऊत दुःखासी नानाच्या येइ अंतरीं. १५

पन्नासी येइ भेटाया, तारुण्यास जरा गिळी,
केलें नानास दुःखानें वृद्ध वृद्धाहुनी अती. १६

भाकरी भाजतां येती फोड हातास नित्यही;
मागचा आठवे काळ वृद्धास त्या पदोपदीं. १७

कोढली भाकरी तैशी, अश्रुसंगें मिळोनिया,
आपुलें दैव जाणोनी वृद्ध खाई कशी तरी. १८

कुळकर्णी जई कष्टें लिहाया सोडि दप्तरा,
ठाकती अश्रु धाराच्या नेत्रीं; सांठें जगीं तम. १९

“आवरतां गुणी बाळ एकही राहतां जरी,
वज्राक्षरें ललाटीची पुसती ह्या कशी परी! २०

श्वानासी केशरी खीर पचली ना अहा! तशी!
सांवडीली भश येतां डाव-रंगांत माधुरी ! २१

गौरीची काय मी आशा बालिकेची अतां करूं!
ठेविलें ह्याच हातांनीं किती बाळां चितेवरी! २२

पाजवील अह्मां कोण पाणी गेल्यावरी वरी!
रौरवीं आमुची वस्ती होई कल्पांत तोंवरी! २३

माझिया मागुती कैशी घनाची ह्या घडे स्थिति!"
कोमेजल्या तशा नेत्रीं अश्रुपंक्ती दुणावती. २४

कधीं नानास तो काळ, गोड जो जीवितापरी
स्मरे, जेव्हां करंडीं हो, जगाच्या सौख्य एकटें. २५

कडीं एकास घेवोनी नाना हिंडति अंगणीं,
पाळण्यांत रडे एक आई ना घेइ जाणुनी; २६

जेवावया न येई तो बापावरी रुसे तिजा;
नानाच्या वाट घांसांना प्रेम देई न सत्वरी. २७

गोड गोड सुधा ऐशी पिवोनी, वृद्ध गुंगुनी,
सोडुनी देहबंधासी, घडीसांठीं बने युवा. २८

विश्व जातां लया ऐसें सारखा वृद्ध तो रडे;
शेवटल्या दिनां तैशा धीर कंठी असा तरी! २९

'कसें झालें! करूं काय!' चिंती हेंची पदोपदीं;
गौरिचेंही परी प्रेम धीर देई तया सदा. ३०

## प्रसंग दुसरा.

दिसांनीं तीस शोषूनी मघा, केलें रितें जया,
आषाढाच्या फुलांतूनी श्रावणाचें निवें फळ. १

काळ्याभोर घनांच्या त्या पखालीं थोर सोडुनी,
कैवारी देव दीनांचा, भूमीपात्रा भरी क्षणीं. २

कुळकर्णी दिनीं एक्या निघे गांवास जावया,
शेजारीं अंतरीं तेवीं गौरिसी धीर ठेवुनी. ३

कोंवळे घालुनी हात कंठीं चंद्रकरांपरी,
'येते नाना' म्हणोनीया रडे बाळा किती तरी! ४

प्रेमदेवी असें याची, 'नाहीं बाळे!' वदोनिया,
चोरुनी अश्रु ढाळी हो, तात तेव्हां किती तरी! ५

गृहिणीची उभी मूर्ति, बिंब तेंची उभें पुन्हां;
उकळी वृद्ध नानाच्या फुटे स्नेहाळ अंतरीं. ६

'कोण सांगे तुला माई! चाललों गे! नसे कुठें!
राधिका बाहते तूज खेळावयास सत्वरी.' ७

'न्या हो, नाना,' परी ऐसें गौरिसंगें वदे घर;
पिता आई तसें सौख्य नानाच त्या जगांतरीं. ८

'सांगतां कां मला खोटें जीन घोडीस लावुनी;
मला न्याना, तिथें त्रास तुह्मां देईन ना कधीं!' ९

'खाऊ आणीन, शेलारी, खेळ खेळावया तसा,
रडूं नको, उगी माय! सांज होतांच येइन;' १०

बालिकेच्या मना, ऐशा गोड गोड भुलावणीं
कोंडूं पाहे पिता तेव्हां, यश ना येइ शेवटीं. ११

'उगी बाळे, अतां येतों, बोधुनी, कुरवाळुनी,
अश्रुसिक्तानना चुम्बी पिता, अश्रूंस ढाळुनी. १२

निघे जाया पिता जेव्हां बालिका बिलगे तया;
स्तब्धला, जाववेना त्या; औरही प्रेम सात्विक! १३

समजावी बहू तीज, समजे तीहि ना परी;
पित्यासी प्रेम—कर्तव्य सुटेना गांठ रेशमी. १४

उजवा हात दोरीनें उजवी फिरवी रवी,
अवज्ञा ही कशी साहे डाव्या हाता अशी परी. १५

शेजारी बोलती, 'न्याना,' बालिका जाइ तोषुनी;

ग्रंथ संग्रहालय ... ग्रंथ नं. ७ ६७०

'पाणी कैसें! कसें नेऊं!' ऐकतांची रडे पुन्हां. १६

रडे ती सारखी बाळा, जनकांतीं कुचावल्या
औदासिन्य भरें; सांत्रें सांज होतां नभीं तम. १७

'साहवेना मला ताप! पाप माझें असें कसें!
डोळे हे झांकितां देव! माझें पुण्य असें कुठें! १८

आधीं मीच न कां गेलों चुकतां त्रास हा तरी!
बांधिला जाउनी ऐसा पाश माझ्या गळ्यामधीं!' १९

उदासीन पिता तेव्हां रागावला मुलीवरी;
होतांची मेघ काळा हो, चकाके वीज अंतरीं. २०

एकाकी बालिका स्तब्ध, पिता पाहूनिया तशी,
रडावी त्यास वाटे हो, क्षणीं पोटीं तिला धरी. २१

गोफणीचा बसे धोंडा, लावी घायाळ कोंवळी
पाहुनी, लागला बाण, प्रेमळाच्या हृदंतरीं. २२

कुरवाळी, तिला चुम्बी घेउनीया कडेवरी;
बाळा ती न वदे कांहीं, रडे तात तिच्यापरी. २३

'येतों बाळे! अतां येतो,' चुम्बुनीया पुनःपुन्हां
घोडिसी मारिली टांच प्रेमळानें परी खरी. २४

नयनीं गौरिच्या लाली सायंकालीन रक्तिमा
पाहुनी, तात तेव्हां तो क्षणीं लगाम आंखडी. २५

'उगी बाळे, अतां येतों,' समजावी पुनःपुन्हां ;
घोडीहुनी किती वेळां उतरे वृद्ध बैसुनी. २६

मध्याह्नीं अंबरीं चेंडू खालीं पडेल जाणुनी
मेघाचें लाविलें जाळें जगन्नाथें दिशांतरा. २७

घोडीवरी तदा गेला देह एक बसोनिया ;
मधामाजीं पडे माशी उडे केवीं कधीं तरी ! २८



# प्रसंग तिसरा.

ब्रह्मगोलाचिया चाकीं पोहरे लाविले अती;
भानुचा पोहरा आज बुडे काळाचिया जळीं. १

सांज झाली तरी कोणी 'चाल बाळे!' म्हणोनिया,
गौरिसी मारिना हांक; बाळा अस्वस्थ अंतरीं. २

येरझारा करी दीना, लाविलें द्वार पाहुनी,
दिशीं पाहूनिया, अश्रु एकांतीं ढाळि बैसुनी. ३

हिंसणें ऐकुनी केव्हां, बोलणें ऐकुनी कधीं,
आले नाना, म्हणोनी ती आशेनें जाइ धांवुनी. ४

शेजाऱ्यास पुसे केव्हां, "नाना येतील हो, कधीं!"
'अतां येतील' शब्दाची जादू जातां, पुसे पुन्हां. ५

लपंडाव अशी आशा पोरिसी खेळुं लागली;
कोवळें बाळ हृत्पद्म मिटाया लागलें तमा. ६

श्रांतल्या अंतराचीं तीं दोंरे लोचन श्रांतलीं—
घेई लावूनिया निद्रा : सुधाधारा जगांतली. ७

नेई निद्रा यदा चित्ता बालिकेच्या धरोनिया;
'नाना नाना' अशा हांका मारी तेंही फिरोनिया. ८

अंधकार नभीं सांठे; अंधकार जगांतरीं;
अस्ता जातांच कर्तव्य नानाच्याहि हृदंतरीं. ९

'अंधार हा बघा कैसा! पाणी येईल, जा उद्यां;'
भाबडी मंडळी तेव्हां करी नानास आग्रहा. १०

सोबती घेउनी धीर वृद्ध माघारला परी;
नाहीं शक्ति जगीं नाहीं प्रेमा जी येइ आडवी! ११

ठाकें चित्र पुढें तेंची : बाळा रागावतां उगी;
अंधारा—देखतां ढाळी पिता अश्रू किती तरी! १२

उडोनी घोडिनें जावें मनोंवेगें असें तया
वाटुनी, वृद्ध मारी हो, त्रासुनी तीस चाबुका. १३

सोबती मारितां हांक कधीं देई न उत्तरा;
मनाचा पाक्षि गेलासे नीडांतून उडोनिया. १४

सात्विकी प्रीतिची जादू सांगूं केवीं असे कशी!
जरेसीही गिळी घोर, यामिनीसी उषा जशी. १५

वरी खालीं दिशीं साऱ्या राज्य अंधार स्थापुनी,

सं-काव्य
८३०



टाकी बंदींत नेत्रांना भानुभक्तास तो क्षणीं. १६

काळाच्याच मुखीं घोर विश्व सारें पडें गमें;
तारका त्या न दाढांचीं शुभ्र टोंकें चकाकतीं! १७

किर्र ऐसा कुठें शब्द; भालु भुंके कुठें कधीं;
घोर शांती दिशीं; कोठें फुर्र ऐसा ध्वनी कधीं. १८

नानाचा सोबती गाई धैर्यासी मोहवावया;
वांटुनी भीति कांपे हो, धैर्य तेंही तदा परी. १९

खरबांत शिरे वाट, भुजंगी जेविं वारुळीं;
सर्र ऐसा ध्वनी होतां बने ती घोडि घाबरी. २०

गड्गडाट उठे तेव्हां, भंगली पश्चिमा गमे;
कल्पांतिंचा तसा डंका घाबरें विश्व ऐकुनी. २१

घनांची जाहली एकी, तारा गेल्या विरोनिया;
अस्वलीशा अती काळ्या तमामाजीं विरें जग. २२

अंधारा दाखवाया कां चकाके वीज अंबरीं?
दीन विश्वा बघोनीया मिषें कां त्या हंसे तम? २३

गार वारा करी सूं सूं, चळ्चळा वृक्ष कांपती;
नीडासवें तुटे शाखा, पांखरें दीन हिंडतीं. २४

सारखी वृष्टि जोराची करी विश्वास घाबरी;
वाजवोनी घरा—वाद्या मेघ हर्षें निनादती. २५

सळसळाट ध्वनी; केव्हां कडाडे वीज अंबरीं,
दिसे कांहीं; तदा वाटे जलें भू—नभ सांधिलें. २६

गौरी कोठें करी चिंता वृद्ध देवास बाहुनी;
मृत्युच्या दारिंचा नाच ऐसा भयान पाहुनी. २७

शमे वृष्टि, शमे वारा, फांकलें मेघमंडळ ;
तरूखालीं कुठें वृष्टि; सळसळाट कुठें ध्वनी. २८

भिजोनी थंडिनें धीर वृद्ध तो कांपुं लागला;
पिकाया लागल्या पाना वात साधा न साहवे. २९

घरीं आले तदा नाना, भेटले गोड जीविता,
प्रसन्नता जला भेटे, दिनश्री भेटली नभा. ३०

प्रेमाची दिवटी ऐशी कल्पांतिंच्या तमासही
गिळीते वाढती नित्य; शक्ति ऐशी कुठें दुजी! ३१

बाळेच्या चुम्बनीं तात आनंदाश्रूंस ढाळुनी
रमे, ब्रह्मीं मुनी जैसा बाह्योपाधीस सोडुनी . ३२

'कांकडतां तुह्मीं नाना, जरा शेका चला चला;'

नानाच्या भाग्यसंध्येची करी हो, कोर आग्रहा. ३३

'आणिला खेळ कां नाना? शिलारी, खाउही तसा?'
पुसे तातास बाळा ती मिठी घालुनिया गळां ३४

'विसरेन कसा माय!' बालिका जाइ हर्षुनी;
पित्याच्या गोड आनंदा क्षणामाजीं दुणावुनी. ३५

'जेवला कां तुह्मीं नाना?' 'नाहीं बाळे' वदे पिता;
'जेवलें मी, तुह्मीं खा हा खाउ,' त्या करि आग्रहा ३६

'नको बाळे! उद्यां खा तूं;' उदासीन बने पिता;
प्रेमलांतीं उभी कांता, लोचनीं आसवें उभीं ३७

'फराळास करूं कां मी?' नको येईहि उत्तर;
चुलीच्या अंतरंगासी अग्नि व्यापी परी क्षणीं. ३८

भाजतां तांदुळां जाती कोंवळे हात भाजुनी;
जनका ना कळों देई तो आडबील जाणुनी. ३९

लाभली ना कुठें गोडी यज्ञींही ऐशि जाणुनी,
पाकसारास ओढी हो, अग्नि तेजाळ हर्षुनी. ४०

पित्यासी बालिका वाढी भुकेल्या भात काजळी;
शितीं लाभे तया गोडी, सुरां ना ती कळेमधीं! ४१

'भात झाला किती काळा!' वदे तातास लाडकी;
'नाहीं! केला असा गोड सांग माय! वदे, कसा!' ४२

जेवतांना करी प्रश्नां; देई पिताहि उत्तरां;
प्रेमाची पाहुनी ज्योत विसरे घांस घ्यावया. ४३

जेवुनी, गौरि पोटासी मायाळू तात घेउनी;
स्वर्ग हाची बघे, जाई निद्रेसी दाखवावया. ४४



## प्रसंग चवथा.

निशा गेली पळोनीया; भानू ढगाळ अंबरीं
चढे पाडीत कांडोरीं जीविताचीं जगाचिया. १

नानाच्या ताप अंगांत सकाळीं खेळूं लागला;
काय ठावे बिचाऱ्याला मृत्युनें पाश फेंकिला? २

नानाचा मूर्त विश्वास, विश्वीं अंतर जें दुजें;
तालंगीं जोशि होता हो, सांब नामा सुधी सुखी. ३

काळाचा साधला डाव, पत्नि झाली दिवंगता;
विश्व गेलें लया, जाई सांब केदार–काननीं. ४

आंवरोनी मना सांब, भजोनी चंद्र—शेखरा,
आनंदाश्रुजलें टाकी घोर दुःखा पुसोनिया. ५

काळाची वांकडी चाल, नक्षत्रीं अंतरापरी
जीवनीं सांब—नानांच्या पाडी भयान अंतर. ६

कधीं नानास भेटाया शंकरा भक्त सोडुनी,
येई तात्काळ तालंगीं; मैत्री अमोल जाणुनी. ७

येउनी आजही तैसा नानासी सांब भेटला;
हृदयाचें खुलें दार वृद्धाच्या जाहलें क्षणीं. ८

नानाच्या सांब नैराश्या हांकाली अंतरांतुनी;
चंद्रमा रम्य तेजाळ तमा जेवीं नभांतुनी. ९

'वाढता ताप माझा बा, भुकेली बालिका बघे,
देवता अंतराचीही न जावें त्वां कधीं मला;' १०

मित्राची याचना ऐशी प्रेमळा लंघवे कशी!
संकल्पा बाडि पूजाया उमाकांतास भक्तही. ११

सांज होई तसा ताप नानाचा वाढुं लागला;
घोर भावी तदा सारें बिंबलें कोमलांतरीं. १२

सांबजी देइ धैर्यासी वृद्धास त्या परोपरी;
ओळखूं कां न येई त्या झुकतो चंद्र पश्चिमीं! १३

खेळावयाहि ना गेली, भूक गेली कुठें तिची,
पित्याचे पाय दाबोनी, बाळा ती न थके अजी! १४

'जेवावयास जा बाळे,' 'भूक नाना नसे मशी;'
बाळेला पाहुनी नेत्र वृद्धाचे वाहती अती. १५

'काय नाना असें काय! बालिका ही बघा रडे;'

नानासी बोधुनी ऐसें, रडे हो, सांब चोरुनी. १६

औषधी सांब नानासी देई कितीक आणुनी;
आयुष्याचें उलें भांडें, कोण सांधील त्या जनीं. १७

"शैल्य झालें तुह्मां नाना भोग कैसा चुके कुणा ?
धीर सोडूं नका ऐसा; नानासी लोक बोधिती. १८

'भांड्यासी फुटक्या भीति फुटायाची असे कुठें ?
गौरी आहे बरें माझी;' बोलवेना पुढें तया. १९

'करा संभाळ हो, हीचा, बाप, आई अतां तुह्मी;'
वृद्धाच्या झांकल्या येतीं आसवें लोचनांतुनी. २०

विद्युल्लतामिषें रात्र, दांत खाऊनिया, गमे,
येई धांवूनिया क्रुद्धा कज्जलांगा जगावरी. २१

नानाच्या घोर खोलींत, घोर विक्राळ काळिमा,
दिव्या खाया टपे घोर शांतिसंगें मिळोनिया. २२

झोंपी गेली तशी बाळा, उठवोनी पिता तिला,
आग्रेंह घालि हो, जेवूं ; शेवटीं हाय ! शेवटीं ! २३

कोण घाली पुढें जेवूं बाळेला, चिंतुनी मनीं,
रडे तात; कसें सांगूं ! कांपे निर्जीव लेखणी ! २४

झोंपली बालिका मुग्ध, सांबासी एकल्या तदा
यमाच्या भीतिनें वृद्ध अंतरा टाकि देउनी. २५

"रडूं नको, उगा सांब, मृत्यु कोणा चुके इथें!
पिकलेलें किती काळ फांदीवरी टिकें फळ ? २६

ज्ञानी तूं, मी तुला सांगूं काय सांबा! उगा, उगा;
लांकडांची प्रवाहीं बा, टिके जोडी कथीं किती! २७

वाटते कां तुला आशा माझी सांबा अजूनिया;
सोडी आशा; असे खोटी; उभा मी दारिं मृत्युच्या. २८

कुणा ठावें क्षणीं वाचा मला जाईल सोडुनी;
म्हणोनी प्रेमळा ऐके विनंती माझि अंतिम. २९

आपुली जन्मली मैत्री बाल्याच्या रे! उषेंतुनी;
वाढली सारखी बापा, अहा! आनंददायिनी! ३०

सांब, तूझ्या वसे नामीं गोडी सांगू किती किती!
स्वर्गही वाटतो तुच्छ शब्दपंक्तीपुढें मशी! ३१

स्नेहाळ तूं, मला ठावें, चित्त तुझें फुलापरी;
जगाची जाणुनी रीत सांब, शोका न तूं करी. ३२

आहे ही बालिका माझी, पोर भारीच हूड बा,

तुझ्यवांचून नाहीं रे, तिला कोणी अतां जगीं! ३३

व्यत्ययासी तुझ्या जाणें अनुष्ठानांत नित्यही;
जगन्नाथें दिला नाहीं सांब, मार्ग दुजा परी! ३४

गांजील ही तुला भारी जाणें सांब, तरी सख्या,
जाणुनी मीच रे! बाळ, करी प्रेमा हिच्यावरी. ३५

सुकृतें आपुल्या सांब, वांचली बालिका जरी;
देई योग्य वरा बापा, लक्ष्मी सारी तिला तशी. ३६

प्राण माझा असे तीच; सुधाधारा जगांतली;
आठवीना कधीं आम्हां अशा अर्पी वराकरीं. ३७

न राही तूं इथें बापा, सोडूं नको तसें तपा;
संकोचा न करी सांब, नेई गौरीस काननीं. ३८

रडूं नको, उगा धीरा, विसरे न मला कधीं!
अपराध जरी झाला सांब, क्षमा क्षमा करी! ३९

पाजवील अम्हां पाणी कोण सांब, म्हणोनिया,
मुक्तकंठ रडे वृद्ध, सांब बोधी किती जरी! ४०

महिषारूढ तो काळ, पाश घेवोनिया करीं
अला वाटे; तदा कांपे रुग्ण सांब म्हणोनिया. ४१

अश्रु ढाळी किती सांब ! झांकी केव्हां न लोचनां;
प्रेमळासी गमे काळ क्षणीं करील वञ्चना. ४२

वृद्धाची पाहुनी ऐशी स्थिती कारुण्य जन्मदा,
निघे ना पाय रात्रीचा घोर रुग्णालयांतुनी. ४३

झाली प्रभात सांबाची फुले आशा फिरोनिया;
बाळेसी सांगती नाना, 'माय खाया करी तरी.' ४४

पिल्यासी आणुनी देई खिचर्डी बालिका तदा;
न जाई त्या, परी वाटे टाकावी सारि खाउनी. ४५

कुरवाळी, तिला चुम्बी, 'माय ! रडूं नको बरें !
त्रास देऊं नको सांबा !' आणी डोळे भरोनिया. ४६

'माय माझी शतायू हो !' कुरवाळी पुनः पुन्हां;
सारखा तन्मुखा पाही; न होई तृप्ति शेवटीं. ४७

'मा-य ये-तो' म्हणोनीया स्तब्धला, ना वदे पुन्हां;
बाळेचे पाहुनी अश्रु कासावीस पिता परी. ४८

क्षणासंगें पळे नाडी, थकली हाय ! आजला !
नियतीनें हंसोनीया अखेरी डाव जिंकिला ! ४९.

गौरिचा ऐकुनी टाहो घोर पाषाण भंगतां !

२१

मुलीचीही परी नाहीं डाकिणीसी आली दया ? ५०

जाहला प्रेतसंस्कार; बाळा पित्या स्मरोनिया
रडवोनी, रडे, सांबा, शून्य सारें विलोकुनी. ५१

स्मरोनी गुण नानाचे सारें तालंगही रडें ;
औदासिन्य भरें गांवीं; भानु जातां नभीं जसें. ५२

राहवेना तिथें सांबा; गांवलोकास सांगुनी,
बाळेसी घेउनी आला शेवटीं धीर काननीं. ५३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
ग्रं. क्र. ३८७
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

## प्रसंग पांचवा.

वृद्धा एक तिथें होती, संसारें गांजिली मृगी;
शेवटीं आश्रिता पायीं जाहली जी हराचिया. १

माइसी सांगुनी सांब कथा सारी, रडे तदा;
रडें आपूर्व ऐकोनी, चकिता वनदेवता. २

'दैव कैसें तुझें बाळे ! माइ गौरीस घेउनी,
अश्रुसिक्तानना तीच्या चुम्बुनी, आसवें त्यजी. ३

कानना पाहुनी बाळा, नवें सारें, रमे जरी;
प्रसन्ना का क्षणीं गंगा पडली पर्वताहुनी ? ४

'नेऊनीया मला सोडा, काका जाऊं चला घरा;'
अश्रुपूर्णानना याची सांबजीस पदोपदीं. ५

चंद्रचूडाचिया माई अर्चनीं सांब गुंगती;
रडे बाळा किती तेव्हां! बसोनीया कुठें तरी ! ६

निघे आणावया जेव्हां सांब सायंतनीं फुलें;
मला नेऊनिया सोडा, विनवी त्यास ती पुन्हां. ७

काका ऐके न, बाळा ती रडे, वाटे हुरूहुरू;
बाळ जाईत्वरी लागे मवा तेव्हां पडावया. ८

तालंगास पळें नित्य हूड जें बालिकांतर;
सांब, माई महायासें आडवीती पदोपदीं. ९

समजावी तिला सांब, कुरवाळी पुनः पुन्हां;
सुकेल वालुका जेवीं सिंधु जाणूनिया मनीं. १०

माई सांगे कथा तीला; खेळूं लागे तिच्यासवें;
बालांतरा न द्यावा हो, स्मृतीनें त्रास जाणुनी. ११

माइचें तें तसें प्रेम, सांबाचेंही तसें, मधु
सांटवीती मनीं तीच्या, मोहळांत हळूंहळूं. १२

माईस त्या कधीं बाळा करी प्रश्नास भोळिसी:—
'मरणें काय हो, माई! मेलेला येइ हो, कधीं?' १३

'देवपाशीं बये, जाई माणूस गे, इथोनिया,
फलाणा तो अहा! गेला! लोक तेव्हांच बोलती. १४

मनुष्या वाटतें यावें परतोनी भुईवरी;
न त्यासी येउं देई ग, देव बाई तदा परी' १५

नाना येतील भेटाया बालिकेसी गमें असें;

गोड आशा तदा तीची क्षणीं गेली लया परी. १६

'येतील ना मला नाना माई, भेटावया कधीं?'
सारखी ती रडे, सांब बोधी माई किती जरी! १७

दैवानें फेंकिला धोंडा दुःखाचा बालिकांतरीं,
जाऊनिया तळीं बैसे खोल कालांतरीं परी. १८

स्मृतीचें टाकिलें चित्र, बालिकेचें पुसोनिया
काळानें; ज्यांत नाना ते बाळेला गोड चुम्बिती. १९

सांबकाका जगीं सार कालांतरीं बने तिचा;
गमे त्या बालिकेसीही तरूची ह्याच मी कळी. २०

शुक्लपक्षीं मुखाची त्या एकेक हो, कला फुटे,
उघडे सांब—माईसी दार एकेक स्वर्गिचें. २१

सांबाची भागली भक्ति प्रवाहीं दोन सारख्या,
शंकरासी पुजी एक, दुजा बाळेस पालवी. २२

सख्या हिमकरापाशीं ठेव ठेवी प्रभा रवि;
आपुला भाव ठेवोनी तोही संगोपना करी. २३

न्यासाची कल्पना गेली लया सारी दिनांतरीं;
शलाका भाग्यतेजाची आपुल्याची गमे तया. २४

विरागी सांबमाईच्या मना, पाशेंच गौरिच्या,
सम्मतीनें पुन्हां बांधी मायेसी दैव शेवटीं. २५

लागले वृक्ष जे बाळू पालवी त्या फुटे अशी;
रम्यता लागली येऊं रम्य केदार — कानना. २६

ऋतूमागें ऋतु येती, एकासी एक लोटुनी,
बाळेसी गोड गौरीसी बघाया शांत काननीं. २७

एक झाली कुमारीची पाळिलेली सखी मृगी;
भिन्नयोनींत कां आत्मा वस्ती विभागुनी करी ! २८

बाललीला तसें प्रेम दोघींचेंही बघोनिया,
गुंगुनी चालतां भानु खाई ठेंचेस सर्वदा. २९

शर्वरी तारकायुक्ता आश्रमीं कपिला फुली;
मंगलेची पवित्रेची गौरी सेवा चुके न ती. ३०

कथा माई कथी रम्य रामायणी सुधा जगीं;
भारती सांगुनी केव्हां रडवोनी, रडे, तिसी. ३१

कुमारी मुद्रिका गाई माईची, सांब आग्रहा
करी जेव्हां; विरे सारा, गायनीं मधु, आश्रम. ३२

दिनीं एक्या दळी माई; साथ गौरी तिची करी;

उभे किरण भानूचे कुडासी गान ऐकिण्या. ३३

पळाया लागलीं पाळू पिठासी त्या धरावया;
बाळेचें गान वृद्धेसी नेई आनंदमंदिरा. ३४

बाळेचे गौरिचे हात उषेसे लाल कोमल,
फोडावतील जाणोनी, माई ती एकटी दळी. ३५

गौरी बाहेर येवोनी, मृगीसी हांक मारुनी,
काबरी बावरी होई सखीसी निज शोधुनी. ३६

पुसे येऊन माईसी, 'कुठें हो माइ चंदिमा?'
"बाहिरीं नाहिं कां?गेली सांबासवें गमे मला! ३७

चारा खाण्यांत गुंगे कां?" शोधी बाळा इथें तिथें;
'चंदिमा चंदिमा' शब्दें घुमूं आश्रम लागला. ३८

आशेच्या शेवटीं तीरीं बाळेचें ठाकलें मन;
शब्द होतांच पानांचा गमे आलीच चंदिमा. ३९

पोहाया फेंकिली सूर्यें उडी पश्चिमसागरीं;
झोंपलेला उठे तेव्हां देई अंधार जांभई. ४०

मंद तारा, खुले लाली डोईवरी तरूंचिया,
किलूकिलाट उठे, पाक्षि फांदीवरीच झोंकती. ४१

मोर नादे, कठें जाती पक्षि खोप्यांत आश्रया;
आश्रमीं हंबरे केव्हां फुलींचें बाळ—वासरूं. ४२

डोकावूं लागला गंध भानु जातां कळींतुनी;
तमाच्या लागली बांधूं वस्त्रांतीं रात्र कानना. ४३

हुंकार देत तान्हाळू कपिला आलि आश्रमीं;
गुराख्यास पुसे गौरी 'पाहिली काय चंदिमा?' ४४

नकारें वाढली तीची काळजी यामिनीपरी ;
घनाची वृष्टिची पाही अस्वस्था वाट चातकी. ४५

पश्चिमेच्या खुले भाळीं टपोरी दिव्य चांदणी;
स्तोत्रावली सुरूं झाली निशेची घोर काननीं. ४६

गाढ गाढ तमासंगें सांब आला, न ती मृगी,
पुसे ती त्यास घाईनें 'कुठें हो, गेलि चंदिमा?' ४७

'काय ठावें मला' ऐसें ऐकतां, बालिका-मन
आशाळू उडतें पान, येई तात्काळ खालतीं. ४८

दिवा घेवोनिया सांब शोधी मृगीस आश्रमीं;
दिव्यानेंही दिसे कां ती वस्तु गेली यमाननीं ! ४९

पुनः वाटे तिला आशा, सांब येई, कथी परी,

मारिली वाटतें ऐसें, रडे ती एकसारखी. ५०

जेवली ना तई बाळा, सांब बोधी किती तरी;
बळें ठाके उभी निद्रा चंदिमा—बालिकेमधीं. ५१

मना वाटें तिथें प्रेम वस्ती जगत्रयीं करी;
ब्रह्मांडीं का बळी ऐसा धरिवीरास आडवी ? ५२

चोरटा हा किती काळ ! कोणी शिक्षा न या करी!
पाहतां पाहतां, नीच प्रियवस्तुस लांबवी. ५३

कालांतराचिया डोहीं बुडोनी गेलि चंदिमा;
कपिला जाहली तेव्हां गौरिची प्रेमसंपदा. ५४

उषेच्या लाल थैलींत घालुनी द्रव्यसंचया,
घाबरी ती निशा नित्य पळे हो, गौरिदेखतां. ५५

वयाचें दार तेरावें उघडें रम्य गौरिच्या;
तारुण्याची कळी रम्य लागलीसे फुलावया. ५६

आलिंगी गोड अंगासी कोंवळ्या परिपक्कता;
रंग चांफेकळी शोभे, शोभली वनदेवता. ५७

लाली तेजाळ ओठांची लाजवी पारिजातका,
लोचनीं तेज चंद्राचें, रम्याननीं खुले सुधा. ५८

सुंदरता कशी वानूं गोड पावित्र्य-जन्मदा !
जननी भानुची रम्या स्तवावी हो, कशी उषा ? ५९

पैशुन्य तें रिघें केवीं गौरिच्या गोड अंतरीं ?
तम भेटें कलेसी का कलंकाच्या मिषें तरी ? ६०

सौंदर्याचें असें सार, स्वर्ग जन्में पदोपदीं,
ईशाची पावना रम्या ज्योत शोभे जगामधीं ! ६१

गृहिणीच्या कला साऱ्या शिकवी माइ गौरिसी,
जीवनाच्या सुधेला ज्या गोडीमाजीं दुणाविती. ६२

तारुण्याचा नवा प्रांत, नवें सारेंच गौरिसी,
आतांशी तीस ती लज्जा भेटाया येउं लागली. ६३

पार्वतीची करी पूजा, याची सौभाग्यकांक्षिणीः-
'नाथदेवास मायाळू देई माते, कृपा करी.' ६४

सांज होई कुठें पक्षी शब्द चूं चूं असा करी,
तुळशी झोंपती तीस पुजेनें गौरि तोषवी. ६५

कुंकूं लेऊनिया भाळीं, मंगला जेविं यामिनी,
सांब काकास माईसी मोहवी गौरि वंदनीं. ६६

'अष्टपुत्रा करी राज्य चिर सौभाग्य लेउनी,'

आनंदाश्रुसवें आशी सुखवी तीस वर्षुनी. ६७

कोंवळ्या प्रेमलतासी, सांब—माईचिया तदा
महती कन्यकामूळ काळजी टाकि व्यापुनी. ६८

अश्रूंनीं सिञ्चुनी द्याया वरासी काळिजा यदा
घजे सांब, क्षणामाजीं शंका करास आंखडी. ६९

मावणीं धीर मेधावी, कुलीनांमाजिं मोहरा,
विप्र राघव तेजाळ गृहस्थाश्रमिंचा तुरा. ७०

गुणासी ज्याचिया टाकी गरीबी दाट झांकुनी,
विमलाम्बू झरा वाहे कचऱ्याच्याहि झांकणीं. ७१

राघवी धाकुटा बाळ, फुलंगी आगिची भली,
टाकिला पाय वेशींत तारुण्याच्या जयें तधीं. ७२

पिवळाई खुले देहीं वाढत्या हर्षवर्धिनी;
विनयादि मनोहारी गुण गेले विकासुनी. ७३

सरस्वतीचिया भक्ता गरीबी नित्य आडवी;
पिळतांची परी तार, नादूं मंजूळ लागली. ७४

पूर्व जन्मानुयोगांनीं टाकिला सांब मोहुनी,
केशवा अर्पिली गौरी, दिनासी जेविं यामिनी. ७५

ताऱ्यापरी निशाकाळीं मावणीं दाटि जाहली;
सनई मोहना हांक आनंदा मारुं लागली. ७६

वेदांचा चालला घोष, मंगलाचा फुटे झरा ;
स्वर्गपृथ्वीस सांधाया पुण्यसंचय लागला. ७७

मंगलाग्नि फुले तेव्हां बोहलीं काञ्चनापरी,
उडवी धूम वस्त्रासी, आनंदी वृत्ति शोभली. ७८

घटिका शोभना आली, जिवाच्या दोन वाहिनी
संगमा पावल्या तेव्हां, अहंभावास सोडुनी. ७९

जानकी ठेविलें नांव, गौरीसंबोधना खुडी;
चढवीली दुज्या वंशीं अश्रूंच्या वेल सिञ्चनीं. ८०

वरी, खालीं दिशीं साऱ्या शुद्ध आनंद कोंदला;
सांठवाया नभीं दाटी घागरींची अती अती. ८१

आनंदी सांबमाईही, कष्टें निरोप घेउनी,
पुजाया शंकरा आलीं, पाउलीं जड काननीं. ८२

## प्रसंग सहावा.

"उषेचा घेउनी लाल बुरखा, पाहि साजणी,
तातडीनें निघे जाया देशांतरास यामिनी १

चपला रात नागीण, पडोनी चाहुला गमें,
शिरते घाइघाईनें कुंकवाशा जलामधीं ! २

निवळें गाढ अंधार, शांति सांठे दिशांतरीं,
विश्रांतरीं बघे कांते, स्फुरूं चैतन्य लागलें. ३

सोडुनी देइ झोंपीसी, व्यथिता विश्वमोहिनी,
नयनांची तुझ्या देवी मिळेना गोडि जाणुनी. ४

मञ्जु टाहो सये, ऐके, मोर माळावरी करी;
चालला गोल हा सारा किल्किलाटें निनादुनी ५

खेळती शीतवायूशीं कुरळे केश मोकळ,
मन्दावलें तुझें कुंकूं भालप्रांतावरी सये ! ६

कोमेजलीं फुलें सारीं सेजचीं, गजरा तसा,
पंजरीं भजना राघू, ऐके, बाबासवें करी. ७

उघडी पावनां नेत्रां, फांकूं दे तेज ह्या दिशीं,
प्रेम-डोहीं करूं द्या हो, स्नान दीनास सत्वरी. ८

मञ्जु ओंठावरी मञ्जु नकारा नाचुं दे तरी,
प्रेमामृता चढे ज्यानें गोडी जीवा! अती अती! ९

नयनें झांकत्या थोडें वांकडें गोड पाहुनी,
स्वामिनी जीविताचे ह्या अजुनी सरशी दुरी ! १०

ठेवीं मांडीवरी कांते, मस्तका करुनी दया,
चाखूं देई बिचारीसी नन्दनांतील माधुरी. ११

वल्लभे, पाहि, पाही हें तिमिराचें फुटे फळ,
विश्व सारें कसें येई बाहिरीं, पाहि साजणी! १२

माळमार्गावरी तेवीं खारीमाजीं अतां सये,
हंव हंव असा शब्द जाई मंजूळ कोंदुनी. १३

कोंदुनी झोंप ही आली आज ऐशी! हंकी हिसी;
थोडकी राहिली वेळ कर्णामृतास पाजवी १४

तरळलीं सये, कां गे, एकाकी लोचनें तुझीं!
वाघाच्या न्हेकणें जेवीं कुरंगी दृष्टि डोळसी. १५

कमळाच्या दळीं जेवीं पाणी खेळे, शिवे न त्या,

कर्तव्यीं वागतां कांते, करावें वज्र अंतरा. १६

भोगितां सारखें सौख्य वीट येतो, रुची न त्या,
ब्रह्मानंद फिका जीवा, कारणें ह्या गमें मला. १७

जिवाची केशवाच्या ह्या मैत्रिणी, प्रेमदेवते,
ढाळिसी अश्रु तूं कां गे! आण माझी तुला सये! १८

रडोनी यामिनी सारी घालवीली, अतां तरी
रक्तिमा लोचनींचा ह्या कांहीं तरी कमी करी! १९

भ्याली भ्याडे, वियोगा कां! त्यासही टाकि जिंकुनी,
संकटां मानितें प्रेम स्वर्गींची एक पायरी. २०

परतोनी पुण्याहोनी कांते, येईन लौकरी,
जीवा माझ्या, तुझ्या आण गळ्याची थाप ना कधीं. २१

नयनांचीं टपोरीं हीं फुलें लाल उषेपरी,
कोमेजलीं सये भारी, दया आम्हांवरी करी! २२

करमेना तुम्हांवीण, जिवा लागे हुरूहुरू,
बोलतीं आसवें तूझीं असें कां धैर्यशालिनी! २३

वाढवीशील दुःखासी माहेरा आठवोनिया,
देणगी पूर्वकर्माची स्वीकारावी हंसोनिया. २४

पळे काळोख गांठोडीं बांधुनी चांदण्यांचिया,
ईश्वरेच्छा सये, तीच पाळिते गे जगास ह्या. २५

निर्दयी खाटिकावानी, काळिजावीण वावरे,
संबोधितील हें सारे मजसी लोक झांडुळी! २६

जीवना, तूजही ऐसें वाटेल का कधी मशी?
अंतरीं वीज कां नाहीं मेघ काळा वरी जरी? २७

साखरेसें नसे गोड, कर्तव्य हें हलाहल;
वेळीं द्यावी सये, लोग आहुती काळिजाचिही. २८

चाळिते काळ राखेसी मृत्युच्या चाळणीमधीं,
मिळे ना त्या जरी सोनें, व्यर्थची जन्म मानवी! २९

पराधीना सदा कांते, रमते वृत्ति कर्दमीं,
निराळा ह्याहुनी स्वर्ग झांपडीनें न जाणुनी. ३०

मायभू गांजिली भारी, काय सांगू सये, तुला!
कोणतें गे दुजें दुःख जिवा ना हें कळे तुला! ३१

वाटतें बैसलें आम्हां मोहांधा वज्रमंदिरीं,
कळेना साजणे, हेंही घूस पायास लागली. ३२

विद्यालयीं शिकें ना मी खळगीही भरावया,

स्वातंत्र्यदेउळीं जाया पायरी एक व्हावया. ३३

आंवरीं आसवें सारीं, सारखीं हीं दुणावतीं;
वेळ येतां, फुलांनेंही करावी वज्रशी कृती. ३४

नेऊं कैसें तुला संगें ! विचारा तूं जरा करीं !
टाकिले हात बांधोनी दैवानें सागरामधीं. ३५

कांटेरी सांचली साय जीवनाच्या पथावरी,
कोंवळे हे तुझे पाय, हट्ट ना तूं सये, धरी. ३६

पाठवीशी न शब्दांतीं अंतरा बांधुनी सये,
रुसवा शारदेचा हा राहणारा इथें किती ! ३७

घरासी सोडितां वाटें, चाललों मी अशा जगीं,
भुयारीं मोडक्या एक्या देविची मूर्ति खोदिली. ३८

सुधानिस्यंदिनी माझे, तुझ्यावांचून जीवना,
कंठीन मी कसा काळ ! विचारी आपुल्या मना! ३९

रडणें हें पुरें आतां, आलिंगी येइ साजणी,
सांगतों मी पुन्हां प्यावा विषप्यालाहि हांसुनी. ४०

चालली ही उषा, पाही, परडी रम्य भानुची
आणाया, वेंचण्या रम्य फुलें तेजाळ पांढरीं. ४१

सारवी खालतीं आई, ऊठ, जाई पुरें रडें;
हांसोनी निर्मलांतानें निरोपा देई पावने ! ” ४२

आज जाऊं नका ऐशी विनंती, अश्रु – संगतीं,
वीराच्या निश्चया ऐशा, परी शून्यांत मेळवी. ४३

उषा गेल्या, किती गेले अस्ता निश्चय ह्यापरी !
प्रेमा वांचूनिया आहे मोहिनी कां कुठें दुजी! ४४

## प्रसंग सातवा.

—:o:—

कलला पश्चिमीं भानु, शांत सारें, गचावरी
कडीं बाळास घेवोनी, रमे केशव अंतरीं. १

स्वर्गाची कल्पना गोड बाळ होवोन पातली;
'आत्मा वै पुत्र नामाऽसि,' बोलली पावना श्रुति. २

तन्मयी केशवा गेलें जग सारें विरोनिया;
जाई फेंसाळुनी प्याला ब्रह्मानंद – सुधारसें. ३

वळोनी पाहि एकाकी, वेगळें दृश्य ठाकलें:
अश्रुचा वाढतां लोट अंचळानें सई पुशी. ४

"जाहलें काय गे ! आज? बोललें कोण साजणी ?
वाहतीं सारखीं केवीं आसवें लोचनांतुनी. ५

काढिशी डागिनेही कां आसवा न्हाणुनी सये!
कारणें कोणत्या रात्र अतांची अरुणा वरी ? ६

सारखे ढाळिसी अश्रु कारणासी न सांगुनी !
आण माझी कथीं तूज, घडलें काय खालतीं!" ७

“पायाची ह्या नसे सेवा   नशीबीं माझिया पुढें !
पहिल्या जन्मिचें पाप !   कुणाची चूक ही नसे ! ८

नाहीं माहेर, ना कोणी,   कांहीं त्याचें न वाटलें !
मिळणार कसें फार   जरी थोडेंच वाहिलें ! ९

आडायाचें कुणाचेंही   कांहीं माझ्याविना नसें;
प्रभ्याची वाहवी चिंता   आईमुळें झुरेल तो. १०

अन्याय रचिलें कोटी,   घातिलें पोटिं नाथजी !”
इतुकें बोलुनी आला   जानकीकंठ दाटुनी. ११

“अविचारा, मनीं थारा   दिधला केविं साजणी ?
गेला कां बोध माझा ह्या   फळघोंसेंच झोंकुनी ? १२

वाटलें ना मसी केव्हां,   आण तूझीच जीवना,
उषेपासून तेजाळ   झरे विक्राळ काळिमा ! १३

किती कष्टें सये, सांगूं   मानवी जन्म हा मिळे !
नव्हे हा केर दारींचा   द्यावा फेंकून झाडुनी ! १४

ह्याच दारें सदा होई   काळकोट, सये, सर,
द्याळ्या नाहीं तरी घोर   चौऱ्यांशीं लक्ष फेरिया ! १५

आत्महत्या जयें केली,   केली वस्ती भुतांमधीं;

होई कल्पांत सृष्टीसी　सृष्टि त्याची चिरावधि. १६

टांकिचे घाव सोसावें,　बाणें देवत्व तेधवा,
तापल्यावांचुनी मोला　चढें सोनें कसें कधीं ? १७

सुरांना जाळिलें आधीं　घोर घोर हलाहलें;
अमृताच्या परी आजी　चुळणी तेच टाकिती. १८

कडू लागेच रोग्यासी　उदारे, ती गुणौषधी ,
गुरूंचीं बोलणीं आह्मां　हितकारीहि बोंचतीं १९

व्हावें वाईट कां त्यांना　आमुेंच गमतें कथीं !
सुधारावें सये, आह्मीं　वांकडें नित्य पाउल. २०

सोसावें कष्टही आह्मी　भावि सौख्यामुळें सये,
नाहीं तरी पशूकोटी　हीन कां ती अह्मांहुनी २१

सूर्याच्या ऐरणी काळ　ठेवी रत्नास मानवी,
उतरतां कसा कांते,　मावें तेज न अंबरीं. २२

कुठें घेई, मला ठावें,　रूढीच्या कचऱ्यामधीं
नीचवृत्ति लपोनीया,　कन्यकांचा सये, बळी. २३

आमुच्या एकट्या दुःखें,　सुख होतें जरी कुळा,
केवढें हें अहा ! पुण्य !　साधली ऐशि पर्वणी ! २४

दहाभांडीं जरी ठायीं एकमेकास लागतीं ;
सांगूं नये सये, केव्हां आपुली देहिं मालकी ! २५

बोललीस असें काय, नाडें माझ्याविना सये;
हृदयाची अहा ! माझ्या केली कां हीच जांचणी ? २६

'केशवाच्या जिवाची हो, कां मालकीण कोणती?'
विचारी तूं दिशांना ह्या, ध्वनी येईल 'जानकी.' २७

संसारिंच्या अहा ! माझ्या चैतन्या गोड पावना,
बोलुनी, कासया केला घाव माझ्या असा मनीं ? २८

जानकीवांचुनी विश्व केशवासी न जन्मलें;
मृत्युच्याही अतां हातीं जोडी ही फोडणें नसे ! २९

खरें मी सांगतों तूज, भरला स्वार्थ ह्यांतही;
एकचाकें न चालेची गाडी केव्हांहि भूतळीं ! ३०

रागाचा रोग हा भारी, जडे जेव्हांहि मानवा,
सुलटें हें क्षणीं त्याची उफराटें दिसें जग. ३१

नंदादीप विवेकाचा विझूं द्यावा न साजणी,
तोषवीतो तदा देव मंगला नित्य वर्षुनी. ३२

रडशी तूं ह्मणोनीया, प्रभाही हा रडे पण;

भुकेला जाहला भारी प्रेमळे ह्यास पाजवी. ३३

बाळाच्या आननीं गोड झरते अश्रु पाहुनी,
आईच्या अंतरीं शक्ति त्यजाया कां असे कधीं! ३४

सूर्याच्या बैसुनी यानीं, कोंवळी किरणावळी,
परदेशीं सये, जाया, बघे, घाई करी किती! ३५

लोपलें बिम्ब भानूचें; फैलला कांठिं लालिमा,
किनारी पैठणीची गे! विलसे लाल रात्रिच्या! ३६

संध्याराग, सये, पाही, येउनी, लाल लोचनां
पुशी तुझ्या, करावी ना अवज्ञा प्रेमळाचि ह्या! ३७

गोड संध्या किती नामी! गोड तूझें किती मुख!
संयोग हा चितारूं दे ललने, थांब अंतरीं! ३८

संध्याराग बघे कांते, पश्चिमीं कांहिं राहिला;
कासेसी रात्रिच्या लागे लाल तेजाळ वासरूं. ३९

पूर्वेकडे शशीचीया उखळा मांडुनी निशा,
लागे कांडावया कांते, उडतें धान्य भोंवतीं. ४०

ऊठ, जाई सये, खालीं, मलाही भूक लागली;
अविचार पिशे, ऐसा करावा कां कधीं? कधीं. ४१

आण माझी सये जा, जा,   समजावी प्रभाकरा;
फार वेळ कधीं रागा   वसूं द्यावें न अंतरीं !" ४२

शकला ना विकासूं त्या   असाही बोध अंतरा ;
चुम्बनानें परी एक्या   पेरिला स्वर्ग भोंवतीं. ४३

चुम्बनीं जन्मलें ह्याची   स्वर्ग तेजाळ नंदन ;
सुधा घेवोनिया हीच   ब्रह्मांडास रची विधी. ४४

आनंदी हेंच माहेर,   काळशत्रु खराखुरा,
चुम्बना वांचुनी विश्व   देह प्राणांविना जसा. ४५

## प्रसंग आठवा.

---

सूर्याच्या किरणीं काळ्या वसना जाड नेसिलें;
बुरख्यासी दिशा घेती, चांदण्यांनीं फुलें नभ. १

बाराच्या वेळ प्रातांतीं श्रांतली चालुं लागली;
पवनारूढ होवोनी पुण्यांतीं थंडि पातली. २

केशवाच्या उषासी तो मंदावला जळे दिवा,
जयाच्या ओढि अंधार करा द्वार – फटींतुनी. ३

पांघुरे केशवाचीही तमाची खोलि घोंगडी;
शिणला झोंपला धीर, शिणली पुस्तकावली. ४

उन्मादी यौवनामोदें भरोनी केशवाचिया,
खोली जाई तदा सारी, सुगंधें कळि सांडल्या. ५

केशवासी पडे स्वप्नः- थाटली चंद्रकोंवळी
सेज, जीच्यावरी धीरें भागली तनु टाकिली. ६

अंगावरी प्रभा खेळे, माखी अंगास चंदनें;
मालकीण जिवाची ती ठाकली दूर विंझित. ७

मंदस्मिता करोनीया कुशलासी पुसे सखी;
सुखसारास वानाया वाणी दुर्बळ मानवी. ८

परस्परां मुक्यांनें तीं हृदयें बोलुं लागलीं ;
खिळले नेत्र नेत्रास , तन्मयी वृत्ति जाहली. ९

'दूर कां ! या, असें यावें,' याचुनी अंचळा तिच्या
अधीरें स्पर्शुनी अंतीं, समाधी गोड भंगिली. १०

सरके, जाहली दूर , पडला हात खालतीं ;
पडदा टाकुनी झोंप पळे त्या मोहिनीवरी. ११

स्वर्गांतुनी पडे खालीं आशाळू केशव क्षणीं,
गोड ती सृष्टि तात्काळ देवथेंबापरी विरे. १२

वेगळेंचि परी दृश्य लोचनां हिरमोडल्यां
दिसताचि, धका बैसे विजेचा घोर अंतरा. १३

तरुणी झोंपली एक बाजुला घोंगडीवरी,
केशवा वाटली माया, होई सम्मूढ मानसीं. १४

उठोनी बैसला दूर, झांकारू रात्र लागली;
अघोरता दिशीं साऱ्या घोर विक्राळ फैलली. १५

' मालती कां इथें येई ! धरोनी काय आशय !

करावें काय, प्रश्नासी बुद्धि देई न उत्तर. १६

थरारूं लागलें चित्त दिवा वाऱ्यामधीं जसा;
बाहिरीं तो बघे, तारे घोर अंधार ओकिती. १७

उठे, बैसे, फिरे, स्तब्ध, जाई तो गांगरोनिया,
धैर्य चित्तीं स्फुरें, लोपें, वीज मेघामधोनिया. १८

धरोनी धैर्य तो जाई शेवटीं उठवावया;
फुटेना एकही शब्द, देह सारा खचे गमें. १९

'ऊठ, जाई बये, खालीं' शेवटीं शब्द अस्फुट
निघती, लोपले हाय! परी शून्यांत निष्फळ. २०

चढे धैर्य जरा कांहीं, शब्द तेचि पुनःपुन्हां,
भिंतिशीं घेउनी झुंज जाती तात्काळ भंगुनी. २१

'झोंपणें हें तुझें येथें, अर्थ होईल वेगळा!
प्राणासी टाकिसी माझ्या व्यर्थ कां सांग संशयीं! २२

धरिलें त्वां मनीं काय! सांग सांग, बये, क्षणीं;
जगन्नाथ सदा जागा, पाहतों सर्व लोचनीं. २३

मौन तुझें पुरें घोर, काय झालें कथीं तुला!
काकाची झोंप मोडावी मज लागेल ना तरी!' २४

उठोनी मालती बैसे, घातली मान खालतीं.
अश्रूंची सारखी धार कपोलीं वाहुं लागली. २५

अविचार तिला वाटे, मृत्यु वाटे तिला बरा;
थरारूं लागली कोर क्षोभल्या डोहिं चिंबली. २६

'रडसी कां,' असा प्रश्न, प्रेमबंध अलौकिक
भाजलेल्या जिवा तीच्या बांधी वाटे तिला परी. २७

डवरल्या बघे नेत्रीं जिवाच्या आदि दैवता;
तम लोपें उषःकालीं, देहबंध क्षणीं तसा. २८

परी हाय ! क्षणीं गोड सुखसांद्र तुटे लय ;
गिळाया सज्जलें घोर पाप वाटें तिला तदा. २९

'रडसी मालती कां गे ? बोललें कां कुणी तुला ?'
जरासा बैसुनी दूर प्रश्न हाचि पुनः करी. ३०

संजीविनी, सुधाधारा, बरसे गोड मोहिनी;
चित्तीं हुरळल्या तीच्या जाई उन्माद दाटुनी. ३१

भीति लज्जा विरें सारें फेंसाळल्या तिच्या हृदीं,
मानिल्या जीवितेशाच्या कंठांतीं घातली मिठी. ३२

बुचडा विस्कळे सारा, झांकली गाढ लोचनें;

केशवाच्या पडे अंकीं सुखसारें विमोहुन. ३३

धृति जाई विरोनीया, चित्त वाटें गळें तया,
ठेवूं शके न सारूंही सुतनू अंकवर्तिनी. ३४

उघडोनी जरा कांहीं अश्रुक्लिन्न - सुलोचनां,
'केशवजी,' तया याची 'असावी हो क्षमा क्षमा. ३५

अंतरें माझिया दुष्टें लज्जा पार हंकालिली,
कुरूपता अहा ! सांठे अंतरीं तेविं बाहिरीं. ३६

वाटतें तोडुनी द्यावा जीवबंध क्षणामधीं,
मानवाचा नको जन्म याचावें ईश्वरा तधीं. ३७

कारुण्यें पूर्ण भेसूर किंकाळी आमुची जगा
वाटते भैरवी हाय ! घोळिली हो सुधारसीं ! ३८

विश्वाचें सार जें प्रेम, भुकेलें विश्व ज्यास्तव,
कण त्याचा जिवा ना ह्या लाभला हो, कधीं कधीं? ३९

तम चौंहिदिशें व्यापी, चळचळा कांपते मती,
दाखवा हो, मला मार्ग दयानाथा, तुह्मी तरी. ४०

विनंती एक ऐकाल नाथजी, काय? ' बोलुनी
मिटले नेत्र, कांपाया लागलें भ्याड अंतर. ४१

आंतला, स्तब्धला धीर, ठेवी खालीं शिरा तिच्या;
'फूत्कारणें पुरें आतां; बये, जा जा,' वदे तिसी. ४२

"लागलें कां तुला वेड? पिशाचें कां पछाडिलें ?
जळेलची गर्मे विश्व ओकिलेल्या तुझ्या विषें? ४३

काळोखल्या तुझ्या चित्तीं विवेका तेववीं क्षणीं;
बये, रम्य वरी पाप, भीषणावास आननीं. ४४

सांवरावा सदा तोल, खोल खालीं दरी अती;
प्रेमाचा घेउनी वेष वावरे काम गे ! जगीं. ४५

बोलणें ही तुझ्यासंगें मार्ग नोहेच चोखटा ;
माफी क्षमा बये, वस्तु देखिली ना वरी कधीं ? ४६

राहुनी ह्या जगीं नाहीं सोडणें शक्य त्यासची;
मनीं तुझ्या तरी अन्या अग्निसाक्ष वरा वरी. ४७

वारुळीं धांवुनी ज्याही करी नागीण आसरा,
जगाची रीतची न्यारी, खांदितें आधिं वारुळा." ४८

आशाळू अंतरा तीच्या क्षणीं चोळून टाकितां;
मिटोनी लोचनां, अश्रु सारखी ढाळुं लागली. ४९

'दुया कैशी जरा नाहीं ईश्वरा ! माझिया, तुला!

पावना प्रीतिसी कां रे! जगा भिवोन दूषिशी ! ५०

अंतराचें, सुगंधांनीं प्रेमपूर्ण फुलें फुल,
दुष्टगंधी नव्हें देवा, नावडे हो ! तुह्मां जरी ! ५१

भिकारीण तुझी मी रे, दारीं तूझ्या असे उभी,
दाता नसे दुजा कोणी ! भिकारी सर्व ह्या जगीं ! ५२

हृदयीं पूजिलें तुह्मां ईश्वरा, मी दिनोदिनीं ;
पावूं नये मला कां हो! हेळसांड कशी मनीं ? ५३

जगानें फेंकितांची कां अक्षता, जोडपें बनें ?
उषेचें भानुचें लग्न लाविलें हो!, कुणी कधीं ? ५४

शुद्धकामें जरी प्रीति पावना रञ्जिली जगीं,
शोभते चांदणी रात संध्यारांगच चित्रिली ! ५५

विश्वास ना तुह्मां येई, न येवो, याचि मी तुह्मां;
द्यावें हो, आपुल्या हस्तें पापिणीसी विषा तरी. ५६

खालीं जाऊन झोंपेन, काळजी ना करा तुह्मी;
आठवा एवढेंची कीं, शुद्ध प्रेमळ मालती. ५७

पुण्य कांहीं जरी माझें, ईशा जाऊन याचिन :-
केशवाच्या पदींची हो, पुण्य-धूली करा मसी. ५८

दा. क्र. ३८७५

नंदनीं जेधवा तुह्मी विलासें जाल मोहुनी,
मालतीसी, वदा देवा, दीनेसी ह्या स्मराल ना ! ५९

जगाचे कुजके बंध तिथें येतील नाडवे ,
पुसाल ना सुधाहस्तें माझिया धूळ अंगिंची ! ६०

जहरा ना जरी द्याल, मोहना ही बघा सुरी ;
साक्ष देईल विश्वासी होती हो, शुद्ध मालती. ६१

जारिणी, पापिणी ऐसें, संबोधील मला जग;
अमृतासी पिवोनीया कींव त्याची करीन मी! ६२

बोधाची सारखी धार वर्षू द्या जी, दयाघना;
त्वरें जाऊं मला द्या हो, सांद्रसौख्यीं विरोनिया ! ६३

अन्याय जाहला घोर ! क्षमा देवा, क्षमा करा !
मालतीची, पिशीची ह्या, कींव, द्यावी असूं मनीं.! ६४

अधरीं हांसणें गोड एकदां शोभुं द्या तरी !
शुद्ध होईन मी त्यांत, उषःकालीं निशा जशी." ६५

डवरले तिचे नेत्र , झांकले वाहुं लागले ;
केशवाच्या मनाचाही लागला झोंक जावया. ६६

मन्मथा, काय ही तूझी गड्या, ! विंघनचातुरी !

समाधी शांभवी भंगे ; पामरांची कथा किती ! ६७

खोलींतला तदा दीप, लपे पात्रांत शेवटीं ;
ओंठ चाटी निशाही ती काढुनी जीभ कोरिची. ६८



## प्रसंग नववा.

——(*)——

वसंतांत सुटीमाजीं, येई घरास केशव,
गृहींची लोपली ज्यासी स्वर्गशीं चारु मोहिनी. १

शांति सारी लया गेली, चांदणेंचि नभांतुनी;
नक्तंदिनीं सुरूं झाली टोंचणी मलिनांतरीं. २

चिंतुनी भावि कालासी आपुलें पाप भावुनी;
बनोनीया अती दीनं, भिजवी धीर अञ्चळा. ३

सुधामधुर संलाप पावना ती सखी करी,
विटाळेल गणोनीया टाळी नित्य तिला परी. ४

एकेदिनीं दुपारीं तो थकलेला निजे जरा;
गृहकर्मीं सई गुंगे, झोंप लागे प्रभाकरा. ५

आई गेली, तसें बाबा शेजारच्या कुण्या घरीं;
आदळले तदा कानीं एकाकी शब्द वज्रसें :— ६

"पराया बोलणें सोपें! विचारीं जानकी, मना,
आपुली झोंपडी पेटे, विझवावी बये, अधीं. ७

मिरवीसी कशा तोरा ! बरी गे मूठ झांकली !
बाभळी ह्याच गांवींच्या जिथें ती बोर वाढली. ८

मिळाला सांब तो तूज, पुण्य तूझें खरें वये !
नाहीं तरी तुला भीक वाढतां ना कुणी जगीं! ९

मुलें होतीं तुह्मां ताई, कंथ राहोनही दुरी !
भागीरथी सदा शुद्ध ! आंत सांठें किती तरी ! १०

नांवाची अंबिरा मी ग, छेडूं नये कुणी मला !
डंवचतां बसे बाई, कुणा ऐशीच फोडणी!" ११

एकाकी शिरला भाला मर्मी ऐसा सुदारुण ;
अंतरा लागली आग क्षणीं चौंहीकडोनिया. १२

जाहला धीर दिङ्मूढ, सांचें अंधार भोंवतीं ;
झांकल्यां लोचनांमाजीं आसवें अंतिं सांठतीं. १३

'नीच विधे, मिळालें ह्या काय चित्तास ठेंचुनी ?
क्रूरता ही किती तुझी ! क्रूरता ही किती किती ! १४

क्षणापूर्वी जरी दुष्टा तोडुनी अंतरास ह्या,
तांडवीं गुंगतासी रे, हर्षतों मी अती अती ! १५

पावनता फुले जेथें नंदनीं कल्पवल्लरी,

ध्वंसुनी राक्षसांनाही लाजवीलें तुवां परी ! १६

शुद्ध होईन तीर्थीं ज्या आशा होती अती अती;
दैव कैसें बघा हाय ! क्षणांतीं तेंच आटलें ! १७

मानिलें विश्व मी रम्य बहिरंगास मोहुनी,
विषाची सांठली खाण अंतरंगीं अहा ! परी. १८

शुचिता — प्रेम— धर्मांनीं मोहवी नीच हें जग ;
भक्ष्य साधावया जाळें निर्मिलें रम्य मोहक. १९

क्रूरते, येइ येई गे, माझिया दुष्ट अंतरीं
राहिल्या प्रीतिसी नीच, टाकी जाळूनिया क्षणीं. २०

केशवाच्या तरी विश्वीं पापी लोकां नसें स्थळ ;'
विचार हा अती घोर मनीं येतां उठे क्षणीं. २१

तमंचांत भरी दारू, फुलला कांपऱ्या करीं ;
उफाळल्या मना तेव्हां क्षणीं विवेक आंवरी. २२

"प्राकृतसा करी काय ? धिक्कार मी असें कुठें ?
फेडिशील कुठें नीचा, पाप ऐसें भयानक ? २३

भार थोडा ह्मणोनीया करिशी काय संचय ?
स्त्रीरक्तें माखुनी हात, याचिसी देव कोणता ? २४

अंबिरा बोलतें सत्य ,  खरें कां हें? कळे कुणा ?
दिसे का आपुली पाठ  आपणांसी अहा ! कधीं ? २५

चुकली ती, चुका होती,  मानवी जन्म हा मुळीं;
नससी घोर पापी का  नीच चांडाळ सोबती ? २६

केशवाच्या जिवाची जी  सखी होती क्षणा अर्धी;
स्वार्थी प्रेम खरें का हें  गिळाया सज्जलें तिसी ? २७

विचारूं काय जावोनी ,  काय सांगेल ती मला ?
नको बा, काय रे ! अर्थ  ध्वंसुनीया तिच्या सुखा? २८

जिवाच्या जीवना, राही  सुखामाजीं निरंतर ;
विषांचा भरला प्याला  एकटाची पिईन मी. २९

आकांक्षे, शांति तूं ध्येया,  क्षणीं जावें इथोनिया ;
सख्या दुःखा, तुला याची,  मायेची बालि पाखर. ३०

देव सोडी, तशी सोडी ,  माझी हो, गृहदेवता ;
दिनानाथा करावी हो ,  दुःखदेवा, अतां कृपा. ३१

तवंग हा सुखाचा ह्या ,  माया जाळें परी विणी ;
ब्रह्मसें सांठलें दुःख ,  पातकी ज्यांत लीन मी. ३२

पापी मीच, मळें माझ्या  देवता माझि भ्रष्टली !"

भरोनी आणिले डोळे, करींचें शस्त्र फेंकुनी. ३३

उठे, बैसे, फिरे, चिंती, तेंची रहाटगाडगें ;
पडेना चैन, तात्काळ पडे बाहेर केशव. ३४

कठोरता उन्हामाजीं, मन्द वाहे समीरण,
पानझडीमुळें गेल्या छाया तरूस सोडुन. ३५

माळाच्या पायथीं दाट अंबराई फुलावली,
पळसीं रक्तिमा सांठे, माथ्यावरी, उषेपरी. ३६

गळत्या मोहरीं तेवीं घोंसलेल्या फुलावरी,
चालल्या गुञ्जनें, गेल्या दिशा साऱ्या निनादुनी. ३७

राईची शीतलाई ती, मधुगंधांत माखली,
रमवूं ना शकें त्या तें स्वर्ग - पृथ्वी - सुमीलन. ३८

प्रेम जातां विरोनीया, बाकूस हें बनें जग ;
झांकळें भोंवतीं वाटें जीवा स्मशान दारुण. ३९

जानकीतें बने तेवीं तिऱ्हाईत प्रभाकरा,
ढेकूळ तें जलामाजीं लागलेसें विरावया. ४०

संशयाचें असें विश्व, उगवे भानु ना जिथें ;
वाटसरूस अंधार जिथें हो, वाट दाखवी. ४१

'काय झालें तुला बाळ' ? हांत पाठीवरोनिया
फिरवोनी पुसे आई , आणी डोळे भरोनिया. ४२

'होतें काय' पुसे कांता , वारंवार दुखावली ;
स्नेहशून्य , मिळे तीस , 'नाहीं कांहींच,' उत्तर. ४३

सतीसी ना कळे कांहीं , तीस आभाळ फाटलें;
घरोनी कोंपरा , नित्य आसवें ढाळि सारखी. ४४

प्रेमाच्या जीवनें दिव्य वाढली कल्पवल्लरी ,
सुकतां तो झरा दिव्य , सुकाया तीहि लागली. ४५

होती नांदत ज्याठायीं रम्यता, दिव्य दिव्यता,
तेंच आवास गेलें हो , छायेनें क्रूर न्हाणुनी ४६



## प्रसंग दहावा.

——:():——

गळती लागली मेघा, फुटे रानास पालवी,
सुखवी तापल्या विश्वा शीतलाई सुधेपरी. १

सांधाया मोडके खोपे लागलीं गांवपांखरें ;
पेरणीची अती घाई मावणीं होउं लागली. २

चौथाई घ्यावया स्वारी प्लेगजीची तदा अली ;
रम्यतावास खेडें तें लागे स्मशान व्हावया. ३

फुलवोनी फुला दिव्य, दाखवी सृष्टि चातुरी ;
ह्मणावें काय नीचेला क्षणीं त्यासीच कुस्करी ! ४

केशवा बोलवोनीया, बांधावी झोंपडी असें
आज्ञापी तात, आईही आग्रहा त्या अती करी. ५

जावयाचें उद्यां रानीं, टाकिलें अंग चिंतुनी –
केशवें; पडती मेघ, कडाडू वीज लागली. ६

सूं सूं शब्द करी वारा, कांत माडीवरी अजी,
निराश जानकीचित्तीं आशा कांहीं समुल्लसे. ७

ठाकली दूर पाहोनी , बसा खालीं ह्मणोनिया ,
निद्रामिषें तदा धीरें फिरवीलें निजानना. ८

घटिका धाइनें येती चाखाया दिव्य माधुरी ,
संलापिंचा मिळे ना त्या कणही त्या जिवा परी. ९

प्रेमाच्या दिव्य सूक्तांनीं, शय्यागार निनादित
होई , तो आठवे काळ वाहतीं लोचनें तिचीं. १०

पायथ्यासी बसे, वाटे चुरावीं नाथ—पाउलें ,
रागावेल गणोनीया सती ती हात आंखडी. ११

पाउलीं जीवितेशाच्या सांठली प्रीत ईश्वरी ,
भेदभाव क्षणीं लोपे , जाहली वृत्ति तन्मयी. १२

चुराया स्पर्शिलें पाय , ऊष्ण हातांस लागतां ,
कोसळे वीज एकाकी सतीच्या अंतरावरी. १३

'होतें काय! किती ताप! किती कपाळ तापलें !
हेंही सांगूं नव्हे कां ? मी अशी कां घोर पातकी !' १४

दाटला कंठ, कांपाया चळ्चळा चित्त लागलें ,
घाईनें येउनी खालीं कथिलें सासुबाइसी. १५

माय ती हंबरा तीनें फोडिला, राघवा कळे ;

येई धांवोनिया वृद्ध, घरीं आभाळ फांकलें. १६

'कांहीं नाहीं, उगी आई, बाबा काय असें ! असे
थकवा हा,' असें त्यांचें करी सांत्वन केशव. १७

गांवठी वैद्य शेजारी मायाळू देइ औषध,
भीमरात्रीसवें लागे ताप वाढावया परी. १८

तीन रात्री तसें गेलें कल्पापरी दिनत्रय,
आशेला ना कुठें थारा, लागे ओहटि केशवा. १९

मावळाया निघे भानु, हंब हंब उठे ध्वनी,
केशवा जवळीं होती अश्रु ढाळीत साजणी. २०

निकटीं ठेपला काळ, सखीसी पाहुनी तशी,
क्षीणस्वरें हंका मारी, 'सये, येई जरा इथें.' २१

पाठीवरोनिया तीच्या फिरवी हात प्रेमळ;
'रडूं नको, कुणा केवीं पाळीही मृत्युची चुके ? २२

कष्ट सोशी परी देवी शिकवावें प्रभाकरा,
जिवींच्या जीवना, आग, ऋणमुक्त मला करीं. २३

दुःखवूं गे ! नको केव्हां आईबाबास साजणी,
पुत्रशोकहतां त्यांना रंजवावें पदोपदीं. २४

सांभाळावा सदा तोल, सांगतों मी पुनःपुन्हां ;
विश्व ना हें कधीं कांते, नेई अन्याय झांकुनी.' २५

विधवेचें उभें चित्र, मुकली नीतिच्या पथा ;
फुटेना शब्द, कांपाया चळ्चळा धीर लागला. २६

'आण बाळा' ह्मणोनीया प्रभासी चुम्बि घेउनी,
'सुखें राही,' स्रवे आशी, अश्रु जाती दुणावुनी. २७

आलिंगी गाढ कांतेसी, चुम्बी तीस पुनः पुन्हां;
'पडणें नाहीं ना कांते, पाऊल वांकडें पुन्हां ? २८

रडूं नको, पुरे जीवा, माझें हें नीच अंतर,
अन्यायी मी असें तुझा, क्षमा कांते, क्षमा क्षमा!' २९

अश्रुसंगें पुसोनीया महद्दुःखासही तशा,
नाथदेवास बोलाया लागली ती पतिव्रताः– ३०

"दुर्दैवें माझिया आली शंका घोर अशी तुह्मां,
पाउलें हींच साक्षी हो, गंगेशीं नाथ शुद्ध मी. ३१

उपयोग अतां काय आणही वाहुनी अशी !
देव माझाच सांगेल, खरी का खोटि जानकी! ३२

मोक्ष माझा निघे जाया, राहीन मी असें कसें

वाटलें नाथ तुह्मांसी , लेंक मी हो, रमाइची!" ३३

देवघरांतुनी आणी पूजाताट पतिव्रता ,
नाथदेवास पूजोनी , लावी कुंकू सुवासिनी. ३४

मंदस्मिता करोनीया , अश्रुक्लिन्न — सुलोचना
अंजुली बांधुनी याची , येत्यें नाथ दयाघना.' ३५

टाकी आई ह्मणोनीया प्रभा लागे रडावया ,
तयासी चुम्बुनी , ठेवी नाथाच्या जवळीं सती. ३६

चरणीं ठेविला माथा , 'अर्थ ना नाथ वारणीं !
क्षमा, द्यावी प्रभ्याची हो, काळजी,' जाइ सांगुनी. ३७

मावणीं गाढ अंधारीं बुडलेल्या गृहांतुनी ,
'आई बाबा' निघे दीन मध्यरात्रीं असा ध्वनी; ३८

करुणापूर्ण भेसूर आतांही तोच ऐकुनी ,
ढाळिती मावणीं अश्रु देव सारे नभांतुनी. ३९

REFBK-0003977
REFBK-0003977
३८०५

